# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
# महाराष्ट्र राज्य, पुणे

रासनिप्रा

**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे –४११००१.**

**फोन नं.** - (०२०) २६०५०६४१

**मेल आयडी** - sceapune@gmail.com **वेब साईट** - scea.maharashtra.gov.in


जा. क्र. रासनिप्रा/कक्ष-११/मतदारयादी व मतदान केंद्र निश्चिती निकष/९५७७/२०२३ दिनांक :-१३/०३/२०२३

निवडणूक प्राधान्य

**वाचावे** :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ (१) (अ)

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ५ ते ७

३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम १८ चे स्पष्टीकरण (ब)

४. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (चार)

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण सत्यमेव जयते महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकांकरीता मतदार यादया तयार करणे व निवडणूकांचे कामकाज चालवणे या बाबींचे अधिक्षण, संचालन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरणावर सोपविलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ५ ते ७ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३ (१) मधील बाजार समितीच्या निवडणूकीकरीता सहकारी संस्थेचा मतदारसंघ, ग्रामपंचायतीचा मतदारसंघ, व्यापाऱ्यांचा मतदारसंघ आणि हमाल व तोलारी यांचा मतदारसंघ या चार मतदारसंघाच्या प्रारूप मतदार यादया तयार करणे अनिवार्य आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ५ ते ७ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३ (१अ) मधील बाजार समितीच्या निवडणूकीकरीता शेतकरी मतदारसंघ आणि व्यापारी व आडत्यांचा मतदार संघ या दोन मतदार संघाकरीता प्रारूप मतदार यादया तयार करणे अनिवार्य आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ५ ते ७ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १३ (१ब) मधील बाजार समितीच्या निवडणूकीकरीता शेतकरी मतदार संघ, व्यापारी मतदार संघ आणि हमाल व तोलारी मतदार संघ या तीन मतदार संघाकरीता प्रारुप मतदार यादया तयार करणे अनिवार्य आहे. आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ८ व नियम ३६ मधील तरतुदीनुसार संबंधीत मतदार संघाच्या अंतिम मतदार यादीमध्ये ज्या व्यक्तीचे नाव नोंदवलेले आहे अशा प्रत्येक व्यक्तीस संबंधीत मतदार संघाच्या वतीने निवडल्या जाणाऱ्या सदस्यांच्या संख्ये इतकी मते देण्याचा अधिकार आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ५३ मधील तरतुदीनुसार मतदान अधिकारी यांनी मतपत्रिकांचा हिशोब मतदार संघ व मतदार केंद्र निहाय नमुना १७ मध्ये तयार